# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २२४ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ३० मे, २००८ (शुक्रवार) |
| वेळ | : | सकाळी ११.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.जॉनी जोसेफ<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.टी.सी.बेंजामिन<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| डॉ.ज.मो.फाटक<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.जी.एस.गील<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री.सीताराम कुंटे<br>सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.रत्नाकर गायकवाड<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

2



**निमंत्रित :**

श्री.मनु कुमार श्रीवास्तव
सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.शाम लाल गोयल
सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.संजय उबाळे
सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.मिलिंद म्हैसकर
अतिरिक्त महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

डॉ.सतीश बागल
वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

कु.उमा अड्सुमिली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..३/-

श्री.श्री.र.नंदर्गीकर
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.ज.व.दिवाण
विशेष कार्य अधिकारी (प्रशासन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २१ फेब्रुवारी, २००८ रोजी झालेल्या २२३ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

दिनांक २१ फेब्रुवारी, २००८ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २२३व्या बैठकीच्या कार्यवृत्तातील चर्चा केलेल्या इतर विषयांपैकी (२) मध्ये नॅशनल टेक्स्टाईल मिल असा उल्लेख झाला आहे. त्यातील "मिल" या शब्दाऐवजी "कॉर्पोरेशन" अशा दुरुस्तीसह ते कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २१ फेब्रुवारी, २००८ रोजी झालेल्या २२३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी यापूर्वी शासनाचे सेवानिवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री.तांबे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालाबाबत कोणती कार्यवाही झाली आहे अशी विचारणा केली.

महानगर आयुक्तांनी असे नमूद केले की, त्या समितीच्या शिफारसी (व्हयूज) लक्षात घेऊनच फेररचना (रिस्ट्रक्चरिंग) करण्यात आली आहे.

त्यानंतर, कार्यवाही अहवालाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**<u>बाब क्र.३</u> : <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठाणे जिल्हयामधील कल्याण व अंबरनाथ तालुक्यांतील २७ गावांच्या क्षेत्रासाठी विकास योजना बनविण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करणे.</u>**

३.१ महानगर आयुक्तांनी यासंदर्भात थोडक्यात माहिती देऊन असे स्पष्ट केले की, सल्लागारांकडून प्रारुप आराखडा तयार करण्याच्या टप्प्यापर्यंतची सर्व कामे या सल्लागारांकडून करुन घेण्यात यावयाची आहेत.

३.२ श्री.टी.सी.बेंजामिन, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी असे मत व्यक्त केले की, नव्याने विकास आराखडा करण्यात येत असेल तेथे अधिक तपशीलवार आणि उत्तम दर्जाचा विकास करण्यासाठी तज्ञ सल्लागार नेमण्याचा विचार करणे उचित होईल.

३.३ श्री.जी.एस.गील, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी असे नमूद केले की, प्रश्नाधीन क्षेत्र सिडकोच्या उत्तरेकडील सीमेलगतचे क्षेत्र दिसते. त्यामुळे तेथील विकास हा लगतच्या सिडकोच्या क्षेत्रातील योजनांशी सुसंगत असणे आवश्यक आहे.

३.४ श्री.सीताराम कुंटे, सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी अशी सूचना केली की, सल्लागारांकडून अपेक्षित कामाची व्याप्ती (स्कोप) त्यांस स्पष्ट करावी.

३.५ अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे मत व्यक्त केले की, अशी विकास योजना तयार करताना प्राधिकरणातील संबंधित नियोजन विभागाचा त्यात सहभाग असावा.

३.६ त्यानंतर, महानगर आयुक्तांनी माहिती दिल्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१०९३</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन,

कार्यकारी समिती याद्वारे कल्याण व अंबरनाथ तालुक्यांतील २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रासाठी विकास योजना बनविण्यासाठी 'सेंटर फॉर एन्व्हॉयर्न्मेंटल प्लॅनिंग अँड टेक्नॉलॉजी, अहमदाबाद' (CEPT) यांची रु.६८ लाख अधिक सेवाकर इतक्या फी वर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सल्लागारांच्या कामाचा आढावा घेणे व विकास योजना वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : मुंबईतील बस जलद वाहतूक सेवेचा विकास आराखडा तयार करणे तसेच ठरविलेल्या रस्त्याकरिता सखोल अभियांत्रिकी निविदा तयार करणे.**

महानगर आयुक्तांनी या प्रस्तावाबाबत थोडक्यात माहिती दिली.

४.१ श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे निदर्शनास आणले की, या विषयावर याआधीही अभ्यास झालेला आहे. इतर देशांमध्येही अशी व्यवस्था आढळते. अलिकडेच दिल्लीमध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली गेली आहे. त्या सर्व पूर्वानुभवाचा आधी आढावा घेणे आवश्यक वाटते.

४.२ त्यानंतर, डॉ.ज.मो.फाटक, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, श्री.मनु कुमार श्रीवास्तव, सचिव, नगर विकास विभाग, श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनीही आपली मते व्यक्त केली.

४.३ महानगर आयुक्तांनी असे निदर्शनास आणले की, इतर ठिंकाणांपेक्षा मुंबई महानगरातील सद्य परिस्थिती भिन्न प्रकारची आहे आणि त्यामुळेच येथे ही योजना व्यवहार्य ठरु शकेल किंवा कसे याचा प्रथम तज्ञ सल्लागारामार्फत अभ्यास करुन घेण्याची आवश्यकता भासत आहे. हा

अभ्यासदेखील टप्प्याटप्प्यानेच करुन घेण्याचा प्रस्ताव आहे. पहिल्या टप्प्यासाठीचा सल्लागारांचा अहवाल प्राप्त झाल्यावर तो पुन्हा कार्यकारी समितीसमोर ठेवला जाईल आणि त्यानंतरच पुढल्या टप्प्यांचा अभ्यास करुन घ्यावयाचा वा नाही यावर निर्णय घेण्यात येईल.

४.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१०९४</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबईतील जलद वाहतूक सेवेचा विकास आराखडा तयार करण्यास तसेच ठरविलेल्या रस्त्याकरिता सखोल अभियांत्रिकी निविदा तयार करण्याकरिता मे.कन्सल्टींग इंजिनियरिंग सर्व्हिसेस जे.व्ही. आणि मौनसेल कन्सल्टंट एशिया यांची निविदा लघुत्तम असून त्यांना रु.१,३४,०६,७९५.२०/- (रु.एक कोटी चौतीस लाख सहा हजार सातशे पंच्याण्णव व वीस पैसे फक्त सेवाकरासहित) इतक्या फी वर सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.५</u> : अ) <u>दिनांक ३०.०९.२००७ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

**ब) <u>दिनांक ३१.१२.२००७ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

महानगर आयुक्तांनी सप्टेंबर, २००७ आणि डिसेंबर, २००७ अखेरच्या त्रैमासिक लेख्यांची थोडक्यात माहिती दिली. कार्यकारी समितीने त्यांची नोंद घेतली.

**बाब क्र.६ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ जानेवारी, २००८ ते दिनांक ३१ मार्च, २००८.**

महानगर आयुक्तांनी प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीबाबतची अद्यावत स्थिती थोडक्यात स्पष्ट केली. तसेच कर्जरुपाने दिलेल्या रकमांचे परतावेही समाधानकारकपणे होत असल्याचे निदर्शनास आणले. कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**बाब क्र.७ : वडाळा भारवाहक तळामधील आणिक आगार ते सायन कोळीवाडा येथील हेमंत मांजरेकर मार्गाच्या जंक्शनपर्यंतच्या २७.४५ मी. रुंद रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याचे कामासाठी निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

महानगर आयुक्तांनी या प्रस्तावाची थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०९५ :**

"**असा ठराव करण्याल येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वडाळा भारवाहक तळ येथील आणिक आगार ते सायन कोळीवाडा येथील हेमंत मांजरेकर मार्गाच्या जंक्शन पर्यंतच्या २७.४५ मी. रुंद रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करण्याच्या कामासाठी मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.७९% कमी दराची म्हणजे रु.२५८२ लाख (रुपये पंचवीस कोटी ब्याऐंशी लाख मात्र) इतक्या किंमतीची लघुत्तम निविदा स्वीकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : ठाणे महानगरपालिकेच्या जेएनएनयुआरएम अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांसाठी कर्ज सहाय्य देणेबाबत.**

महानगर आयुक्तांनी असे निदर्शनास आणले की, या आधीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत या बाबीवर चर्चा झाली होती व तत्वतः त्यास आक्षेप नाही. परंतु त्यावेळी याकरिता अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतूद झालेली नसल्याने प्रथम तशी तरतूद करण्यात यावी आणि नंतर या प्रस्तावावर निर्णय घ्यावा असे ठरले होते.

८.१ अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे मत व्यक्त केले की, सध्या फक्त ठाणे महानगरपालिकेला सहाय्य करण्याचे प्रस्तावित आहे हे जरी खरे असले तरी एकदा हे तत्व स्वीकारले की, इतरांकडूनही प्रस्ताव येतील त्यामुळे यावर काळजीपूर्वक विचार होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने मा.महानगर आयुक्त यांनी इतरांचेही काही प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त झाल्याचे स्पष्ट केले.

८.२ डॉ.ज.मो.फाटक, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे मत व्यक्त केले की, मुंबई महानगर प्रदेशात शहरातील मलनिःसारणसारख्या मूलभूत सुविधांची परिस्थिती चांगली नाही आणि अशा परिस्थितीमध्ये सुधारणा आणण्यासाठी लागणा-या प्रकल्पांस अर्थसहाय्य करणे समर्थनीय आहे. या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेला सहाय्य करण्याची खरोखरीची गरज आहे याबाबत दुमत नसावे.

८.३ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे मत मांडले की, यापूर्वीच्या बैठकीत या विषयावर चर्चा झाली होती आणि अर्थसंकल्पात जरुर ती तरतूद झाल्यावर प्रस्तावास मंजुरी देण्याचे तत्वतः मान्य झाले होते. त्यामुळे आता जरुर ती तरतूद झालेली असल्याने यावर आणखी उहापोह करण्याची गरज आहे काय याचा विचार व्हावा.

८.४ अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे मत व्यक्त केले की, प्राधिकरण जरी स्थानिक संस्थांना कर्जसहाय्य देत असले आणि प्राधिकरणाने JNNURM प्रकल्पांना कर्जसहाय्य देण्यास तत्वतः मान्यता दिली असली तरी ठाणे महानगरपालिकेस सदर कर्ज देणे हे वास्तविकतः नवे

..९/-

धोरणच स्वीकारले जाणार आहे. तसेच प्राधिकरणाला वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंडाच्या वितरणातून मिळालेल्या निधीमुळे सध्या जरी आर्थिक स्थिती चांगली दिसत असली तरी एकदा हा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत समाप्त झाला की, आर्थिक स्थितीबाबतची सध्याची परिस्थिती कायम राहिलच याची शाश्वती नाही. त्यामुळे हे धोरण स्वीकारावे का नाही याचा बारकाईने विचार प्राधिकरणाच्या पातळीवर होणे आवश्यक आहे.

८.५ अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असेही सुचविले की, प्राधिकरणाने दरवर्षी या प्रयोजनासाठी अर्थसंकल्पात ठराविक रक्कमेची तरतूद करुन त्या तरतुदीच्या मर्यादेत या योजनेअंतर्गत सहाय्य देण्याचा विचार करणे अधिक संयुक्तिक ठरेल.

८.६ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, मागच्या बैठकीनंतर प्राधिकरणाच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करु शकतील असे काही निर्णय (जसे की, मेट्रो रेल्वेचा प्रकल्प इ.) घेतले गेले/ प्रस्तावित आहेत. त्यामुळेही या प्रस्तावाचा अधिक विचार होणे आवश्यक ठरले आहे.

८.७ त्यानंतर, श्री.संजय उबाळे, सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग यांनी निदर्शनास आणले की, JNNURM अंतर्गत ५०% निधी अनुदानाच्या स्वरुपात प्राप्त होत असल्यामुळे उर्वरीत रक्कम शासकीय संस्थेकडून न घेता बाजारातील वित्तीय संस्थांकडून उभारणे योग्य होईल. अशा कर्जांचा व्याज दर जास्त असेल तर प्राधिकरणाचा व्याज दर व अशा बाजारातील व्याज दरामधील तफावतीची रक्कम प्राधिकरणाने व्याज सवलत (interest subsidy) स्वरुपात देण्यावर विचार करावा.

८.८ त्यानंतर, श्री.सीताराम कुंटे, सचिव, गृहनिर्माण विभाग, श्री.मनु कुमार श्रीवास्तव, सचिव, नगर विकास विभाग आणि इतर सदस्यांनी वरील पर्यायाचा विचार करावा अशी सूचना केली.

८.९ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, चर्चेत उपस्थित झालेल्या सर्व मुद्यांची छाननी करुन ही बाब प्राधिकरणाच्या बैठकीसमोर विचारार्थ ठेवण्यात येईल.

..१०/-

**बाब क्र.९ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावर ११ ठिकाणी पादचा-यांकरिता पूल बांधणे लघुत्तम निविदेला मान्यता देणेबाबत.**

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पश्चिम द्रुतगती महामार्गाचे बहुतांशी काम पूर्ण झाले आहे व हा रस्ता १४ मार्गिका (Lanes) एवढा रुंद झाला आहे. रस्त्याच्या दुतर्फा राहणा-या नागरिकांना रस्ता ओलांडण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे ज्यामुळे महामार्ग ओलांडताना अपघात होणार नाहीत. त्यानुसार रहिवाशांच्या मागणीनुसार व लोकप्रतिनिधींनी सुचविल्याप्रमाणे ११ ठिकाणी पादचा-यांकरिता पूल (Foot Over Bridges) बांधण्यासाठी कंत्राटदारांच्या संकल्पनानुसार (lump sum basis) निविदा मागविण्यात आल्या. उक्त कालावधीत ७ ठेकेदारांनी निविदा खरेदी केल्या व २ ठेकेदारांनी विहित कालावधीत निविदा सादर केल्या. त्यानुसार मे.राजदिप बिल्डकॉन प्रा.लि. यांची रु.१५,८६,००,०००/- (१.४८% कमी) रकमेची निविदा लघुत्तम आहे तसेच संवादी आहे. सदर निविदा स्वीकारण्यासाठी कार्यकारी समितीला शिफारस सादर करण्यात येत आहे.

९.२ प्रस्तावावर चर्चा करताना महापालिका आयुक्त यांनी पादचारी पुलाच्याऐवजी भुयारी मार्ग बांधण्याचा प्रस्ताव करण्यासंबंधी सूचना केली. मुख्य सचिव यांनी अशा भुयारी मार्गामध्ये पावसाळयामध्ये पाण्याचा निचरा करणे जिकिरीचे असल्यामुळे या प्रस्तावाच्या पावसाळयातील उपयुक्ततेबाबत शंका व्यक्त केली. पुढे चर्चेच्या दरम्यान श्री.संजय उबाळे, सचिव (विशेष प्रकल्प) यांनी सदर पुलाचे काम आंतरराष्ट्रीय दर्जाचे असावे अशा सूचना दिल्या. पादचारी पुलांची कामे सुबक व आकर्षक दिसावीत म्हणून हया क्षेत्रातील तज्ञांकडून प्राप्त होणा-या सूचनांचा विचार मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने करावा असे निर्देश मा.मुख्य सचिव हयांनी दिले.

९.३ चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०९६ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

..११/-

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावर ११ ठिकाणी पादचा-यांकरिता पूल बांधण्याच्या कामासाठी मे.राजदीप बिल्डकॉन प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.४८% कमी दराची म्हणजे रु.१५,८६,००,०००/- किंमतीची लघुत्तम निविदा स्वीकारण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : वांद्रे-कुर्ला संकुलामधील "जी" ब्लॉक येथील ३० मीटर रुंद रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याचे कामासाठी प्रशासकीय मान्यता व निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

१०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील विविध पायाभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी प्राधिकरणाची आहे. सदर सुविधांतर्गत रस्त्याची कामे हाती घेण्यात येत आहेत. त्यानुसार या संकुलात कार्यरत असलेल्या वित्तीय कार्यालयांसाठी योग्य दर्जाचा टिकावू रस्ता उपलब्ध होण्यासाठी "जी" ब्लॉकमधील ३०.० मी. रुंदीच्या सुमारे १.८० कि.मी. लांबीच्या ४ पदरी मार्गिकेच्या कॉंक्रिट रस्त्याच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या. निविदेतील शर्तीनुसार एकूण १३ निविदाकारांनी कोरे निविदा संच खरेदी केले व त्यापैकी ४ निविदाकारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या. निविदांच्या छाननीनंतर मे.विशाल इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचा वाटाघाटीनंतर लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.२०% कमी आहे. सदर देकार लघुत्तम व सुसंवादी असून कामाचे कंत्राटदार यांना या कामाचा पूर्वानुभव असल्यामुळे हा देकार मंजूर करण्यासाठी शिफारशीसह कार्यकारी समितीस सादर करण्यात येत आहे.

..१२/-

१०.२ या प्रस्तावावर चर्चा करताना सदर प्रस्ताव अंदाजपत्रकापेक्षा कमी प्राप्त होण्यासंबंधी काय कारणे असावीत याची चर्चा झाली. त्यावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सदर कामामध्ये कोणत्याही झोपडया नसल्यामुळे व इतर कोणताही अडथळा नसल्यामुळे निविदा कमी दराच्या प्राप्त झाल्याचे सांगितले.

१०.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.१०९७ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील नॅशनल स्टॉक एक्सचेंजपासून ते नाबार्डपर्यंतच्या ३० मी. रुंद रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्याचे कामासाठी रु.१६.९७ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील कामासाठी मे.विशाल इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) ७.२०% कमी दराची म्हणजे रु.१५७४.५० लाख इतक्या किंमतीची लघुत्तम निविदा स्वीकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

..१३/-

**<u>बाब क्र.११</u> : <u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक १ ऑक्टोबर, २००७ ते ३१ मार्च, २००८.</u>**

महानगर आयुक्त यांनी या बाबीची थोडक्यात माहिती दिली व ती समितीच्या माहितीकरिता सादर करण्यात आली असल्याचे निदर्शनास आणले.

कार्यकारी समितीने नोंद घेतली.

**<u>बाब क्र.१२</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गाचे रुंदीकरण व सुधारणा करणे - मंजूर निविदेवरील वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.</u>**

**१२.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राप्त निविदांची किंमत रु.३२२.० कोटी एवढी असून विविध निविदांना कार्यकारी समितीने वेळोवेळी मंजूरी दिलेली आहे. सदर काम हे विविध टप्प्यांमध्ये असल्यामुळे निविदा मागविण्याचे काम आवश्यकतेनुसार हाती घेण्यात आले. परंतु रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे, सेवावाहिन्या हलविणे, कामातील तांत्रिक बदल, कामाच्या व्याप्तीमधील वाढ इत्यादी कारणांमुळे कामास वेळोवेळी मुदतवाढ देणे प्राप्त ठरले. सद्यस्थितीत ८०% हून जास्त काम पूर्ण झाले असून उर्वरित काम डिसेंबर, २००८ अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. कार्यकारी समितीने २०% वाढीव खर्चास मान्यता देण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान केले आहेत. परंतु सदर अधिकार कामाच्या व्याप्तीमधील वाढ अधिक भाववाढ एकत्रित धरुन असल्याचे मत वित्तीय सल्लागार यांनी दिले. त्यामुळे सदर प्रस्ताव मंजुरीसाठी कार्यकारी समितीस सादर करण्यात येत आहे. मात्र आवश्यकतेनुसार कामाच्या व्यापात झालेली वाढ कार्यकारी समितीस वेळोवेळी सादर केली आहे. परंतु एकत्रितरित्या मंजूरीसाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**१२.२** प्रस्तावावरील चर्चेच्या अनुषंगाने श्री.सीताराम कुंटे, सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी या कामामध्ये मोठया प्रमाणावर अतिरिक्त बाबी (Extra item) अंतर्भूत केल्याचे निदर्शनास आणले व भाववाढ वगळता अशा अतिरिक्त कामांची रक्कम रु.९०.० कोटी एवढी असल्याचेसुध्दा निदर्शनास आणले व एवढया मोठया रक्कमेच्या अतिरिक्त बाबींची आवश्यकता का भासली अशी विचारणा केली. याबाबत माहिती देताना श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की,

२५.० कि.मी. लांबीपैकी सुमारे ६.० कि.मी. लांबीचे रस्ते टिकावूपणाच्या दृष्टीने काँक्रीटचे बांधण्यात आले. तसेच सुमारे ६.० कि.मी. लांबीचे सेवा रस्ते पेव्हर ब्लॉकने बांधण्यात आले. त्यामुळे रस्त्यांची किंमत सुमारे रु.२४.७१ कोटी एवढी वाढली. तसेच अधार भिंत (Retaining wall) व एकूण ४ डोंगराच्या खडकाच्या खोदाईमध्ये ब-याच प्रमाणात वाढ झाली त्यामुळे रु.१९.५० कोटी एवढा वाढीव खर्च लागला. सदर ठिकाणी सुरुवातीस झोपडया असल्यामुळे कामाच्या आवाक्याचा अचूक अंदाज करता आला नाही. श्री.मनु कुमार श्रीवास्तव, सचिव, नगर विकास विभाग यांनी अतिरिक्त बाबींचे दर कसे ठरविले अशी विचारणा केली. त्यावर श्री.नंदर्गीकर, मुख्य अभियंता यांनी सदर दर त्या वेळच्या दरसूचीनुसार ठरविण्यात आले व दरसूचीमध्ये नसलेल्या दरांसाठी दर पृथःकरण (Rate Analysis) केल्याचे सांगितले. तसेच सदर दर हे माजी अतिरिक्त महानगर आयुक्त (अभियांत्रिकी) व मुख्य अभियंता यांनी वेळोवेळी तपासून त्यावर मंजूर केल्याचेही सांगितले. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी याबाबत प्रस्तावामध्ये अशात-हेचे प्रमाणपत्र सादर करावयास हवे होते असे सांगितले. यापुढील अशाप्रकारच्या प्रस्तावामध्ये असे प्रमाणपत्र अंतर्भूत करुन प्रस्ताव सादर करावा अशा सूचना त्यांनी दिल्या. मुख्य सचिव यांनी पुढे असे निर्देश दिले की, सदर वाढ मंजूर करताना सर्व अतिरिक्त बाबींचे दर प्राधिकरणामधील सक्षम अधिका-यांकडून (Competent Authority) प्रमाणित करण्यात यावेत.

**१२.३** यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१०९८ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गाचे रुंदीकरण व सुधारणा करणे या कामाच्या रु.४६४.५७ कोटी इतक्या सुधारित रकमेच्या कामास मंजूर केलेल्या निविदेअंतर्गत करण्यास मान्यता प्रदान करीत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर सुधारित अंदाजपत्रकीय रक्कमेच्या मर्यादित राहून कंत्राटनिहाय व पॅकेजनिहाय देयके अदा करण्यास (तक्ता क्र.१ नुसार) महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

| कामाचे नांव | मंजूर निविदेची रक्कम (रु. कोटी) | कामाची सुधारीत रक्कम (रु.कोटी) | वाढ (रु.कोटी) | शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|
| पश्चिम द्रुतगती महामार्गाचे रुंदीकरण व सुधारणा - वांद्रे ते दहिसर (२५.३० कि.मी.) | ३२२.०० | ४६४.५७ | १४२.५७ | ४४.२८% |

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सदर वाढीव खर्चामुळे समंत्रक यांच्या कामात व वेळेत वाढ झाल्याने, समंत्रकांच्या शुल्कापोटी रु.१५.०० कोटी रकमेच्या एकूण खर्चास मंजूरी देण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** विविध अतिरिक्त बाबींचे दर प्राधिकरणांतर्गत सक्षम अधिका-यांद्वारे प्रमाणित करण्यात यावेत व त्यानुसारच देयके अदा करण्यात यावीत.

"**पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्त्यांची कामे -**
**(अ) स्वामी विवेकानंद मार्ग व लिंकींग रोड (वांद्रे ते सांताक्रुझ पॅकेज-३)**
**(ब) स्वामी विवेकानंद मार्ग (सांताक्रुझ ते गोरेगांव - पॅकेज-२) या रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या व सुधारीकरणाच्या कामांच्या सुधारीत खर्चास मान्यता देणेबाबत.**

**१३.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, स्वामी विवेकानंद मार्ग व लिंकींग रोड या रस्त्याची कामे ३ पॅकेजमध्ये विभागणी करुन देण्यात आलेली होती व त्यानंतर कामाची प्रगती साधण्याच्यादृष्टीने पॅकेज-२ चे काम ३ कंत्राटदारांना मूळ

कंत्राटदाराकडून काम काढून घेऊन कार्यकारी समितीच्या मंजूरीनुसार विभागून देण्यात आले होते. सदर रस्त्याचे काम अतिक्रमणातील लांबी वगळता पूर्ण करण्यात आले असून सध्या महानगरपालिकेकडे रस्ते हस्तांतरित करण्याची कार्यवाही चालू आहे. काम करतेवेळी आवश्यकतेनुसार स्थळ परिस्थितीनुसार आणि महानगरपालिकेच्या शे-यानुसार काही अतिरिक्त बाबींचा अंतर्भाव करण्यात आला. त्या अनुषंगाने कामाच्या खर्चामध्ये वाढ झाली, यामध्ये वांद्रे ते सांताक्रुझ या लांबीमध्ये सुमारे २६% लांबीचा जादा रस्ता करावा लागला. तसेच काही जादा C.D.Works ची कामे करावी लागली, काही गटारे वाहतूकीच्यादृष्टीने मजबूत करावी लागली व इतर वाढ ही भाववाढीमुळे झाली. एकूण रु.४६.९८ कोटी मूळ किंमतीऐवजी रु.६३.६१ कोटी एवढी वाढ अपेक्षित आहे. त्यापैकी १०.३४% एवढी वाढ भाववाढीमुळे झाली असून २५.०५% वाढ कामाच्या व्याप्तीमुळे झाली आहे.

**१३.२** चर्चेच्या अनुषंगाने मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी विचारणा केली की, सदर रस्ते महापालिकेकडे सुपूर्द केल्यानंतर दोष दायित्व (Defect Liability Period) च्या कालावधीमध्ये रस्त्याची देखभाल कोणी करावी. यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दैनंदिनी देखभालीची जबाबदारी महापालिकेची राहील परंतु केलेल्या कामामध्ये दोष आढळल्यास सदर काम मूळ कंत्राटदाराकडून दोष दायित्व कालावधीतील कलमानुसार करुन घेण्यात येईल. याबाबत सदर रस्त्याची मूळ मालकी व जबादारी महापालिकेची असल्यामुळे या रस्त्याचे हस्तांतरण महापालिकेकडे करणे आवश्यक आहे.

**१३.३** सदर कामामध्येसुध्दा विविध अतिरिक्त बाबी असल्यामुळे त्यांच्या दराच्या योग्यतेविषयीचे प्रमाणपत्र सक्षम अधिका-यांकडून करुन घेणे आवश्यक असल्याच्या सूचना मुख्य सचिव यांनी दिल्या.

**१३.४** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१०९९</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

..१७/-

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे स्वामी विवेकानंद मार्ग व लिंकिंग रोड (वांद्रे ते सांताक्रुझ) - भाग ३ आणि स्वामी विवेकानंद मार्ग (सांताक्रुझ ते गोरेगांव-भाग-२) यांच्या रुंदीकरण व सुधारीकरणाच्या कामाच्या सुधारीत खर्चास तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नांव | स्वीकृत निविदा रक्कम (रु.) | सुधारीत खर्च (रु.) |
|---|---|---|---|
| **अ) पॅकेज ३. स्वामी विवेकानंद मार्ग व लिंकिंग रोड (वांद्रे ते सांताक्रुझ)** | | | |
| १. | मे.आर.पी.शाह | १३,९८,४५,०५३/- | १९,६७,३१,२४७/- |
| **ब) पॅकेज २. स्वामी विवेकानंद रस्त्याचे रुंदीकरण व सुधारीकरण (सांताक्रुझ ते गोरेगांव)** | | | |
| १. | मे.ॲटलांटा लिमिटेड | ३३,००,००,०००/- | ६,५६,९७,७१३/- |
| २. | मे.आर.पी.शाह | | ११,६४,९२,२५५/- |
| ३. | मे.आर.के.मधानी | | २३,९५,४९,०३२/- |
| ४. | मे.विशाल अमर जॉईंट व्हेंचर | | १,७६,६१,९५५/- |
| | एकूण (ब) | | ४३,९४,००,९५५/- |
| | एकूण (अ) + (ब) | ४६,९८,४५,०५३/- | ६३,६१,३२,२०२/- |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर वाढीव खर्चामुळे समंत्रक यांच्या कामात व वेळेत वाढ झाल्याने, त्यांच्या शुल्कामध्ये ही अनुषंगिक वाढ झाली आहे. सदर वाढीमुळे होणा-या रु.४ कोटी रकमेच्या खर्चास मंजूरी देण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** विविध अतिरिक्त बाबींचे दर प्राधिकरणांतर्गत सक्षम अधिका-यांद्वारे प्रमाणित करण्यात यावेत व त्यानुसारच देयके अदा करण्यात यावीत.

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणारी पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्त्याची कामे - अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्याचे साकीनाका ते पूर्व द्रुतगती मार्ग रुंदीकरण व बांधकाम (भाग क्र.५, साखळी क्र.९९७२.० मी. ते साखळी क्र.१०७७२.० मी.) - खोदकाम व भरणी.**

१४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर काम अंधेरी-घाटकोपर रस्त्याच्या सुटलेल्या लांबीमधील (Missing link) आहे. या एकूण १.३ मी. लांबीच्या रस्त्याचे काम प्रथमतः मे.पेट्रॉन प्रतिभा (जे.व्ही.) यांना देण्यात आले होते. परंतु कामाची मुदत संपेपर्यंत झोपडयांचे स्थलांतर न झाल्यामुळे कंत्राटदाराच्या विनंतीनुसार दिनांक २६ फेब्रुवारी, २००८ रोजी काम Foreclose करण्यात आले व कामाच्या स्वतंत्र निविदा मागविण्यात आल्या. सदर काम मेट्रो लिंकच्या आखणीमधील असल्यामुळे त्वरेने पूर्ण करणे आवश्यक आहे. मूळ रु.१६.५० कोटी अंदाजाच्या निविदेसाठी विहित कालावधीत एकूण ५ प्रस्ताव प्राप्त झाले व त्यापैकी मे.एसएनबी-आरसीसी (जे.व्ही.) यांचा अंदाजित रक्कमेपेक्षा ३३.३०% कमी देकार लघुत्तम व संवादी असल्यामुळे सदर देकार मंजुरीसाठी कार्यकारी समितीस सादर करण्यात आला आहे.

१४.२ श्री.र.य.तांबे यांनी या निविदा एवढया कमी दराच्या का आल्या असाव्यात याची विचारणा केली. त्याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर आखणीमधील झोपडया काढून टाकण्यात आल्यामुळे काम त्वरेने पूर्ण होऊ शकेल. तसेच सदर काम हे यंत्रांनी (machinery) करावयाचे असल्यामुळे कामामध्ये जास्त गती आणून यंत्रांचा जास्तीत जास्त वापर करता येऊ शकेल व यंत्र विनावापर राहणार नाहीत यामुळे निविदांचे दर कमी आले असावेत.

१४.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.११०० :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

..१९/-

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्याचा भाग क्र.५ च्या कामासाठी प्राप्त झालेली मे.एसएनबी-आरसीसी(जे.व्ही.) यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३.३०% कमी दराची म्हणजे रु.११,०१,११,५९६.२८ (रुपये अकरा कोटी एक लाख अकरा हजार पाचशे शहाण्णव आणि अठ्ठावीस पैसे मात्र) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट वस्तुंच्या बाजारपेठा (स्थल नियमन) अधिनियम, १९८३ च्या (१९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२) कलम १० अन्वये, मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती कळंबोलीच्या सदस्यांची निवडणूक घेण्याकरिता विनियम.**

या प्रस्तावाची महानगर आयुक्त यांनी थोडक्यात माहिती दिली.

**१५.१** श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली या समितीच्या आवश्यकतेबाबतच विचार होत असल्याचा जो उल्लेख बाब टिप्पणीत आहे त्याकडे लक्ष वेधले. त्यानंतर विधी सल्लागारांनी या समितीच्या स्थापनेमागील पार्श्वभूमी व कायदेशीर तरतुदींची थोडक्यात माहिती दिली.

**१५.२** महानगर आयुक्त यांनी असे निदर्शनास आणले की, प्रस्तावित केल्याप्रमाणे निवडणूक घेऊन समितीमध्ये ६ प्रतिनिधींची निवड करणे ही अधिनियमातील तरतुदींनुसार आवश्यक असलेली बाब आहे. त्यामुळे समिती बरखास्तीबाबत स्वतंत्रपणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी आणि सध्याच्या प्रस्तावाशी त्याची सांगड न घालता प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

..२०/-

१५.३ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी तशी कार्यवाही करण्यास हरकत नाही मात्र त्या मुद्यासंदर्भातही उचित निष्कर्षाप्रत येणे (लॉजिकल कन्क्लूजन) अगत्याचे असल्याचे प्रतिपादन केले.

१५.४ त्यानंतर, प्रस्तावास समितीने मान्यता दिली व पुढीलप्रमाणे ठरावास मंजूरी दिली.

<u>ठराव क्र.११०१</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट वस्तुंच्या बाजारपेठा (स्थल नियमन) अधिनियम, १९८३ च्या (१९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२) कलम १० अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे यासोबत जोडलेल्या जोडपत्र-अ आणि जोडपत्र - १ व २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीचे "निवडणूक विनियम २००८" यांस मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र.१६</u> : **<u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-१ च्या सेवामार्गाच्या (Service Road) अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u>**

या प्रस्तावाची महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीस थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर, कार्यकारी समितीने प्रस्तावास मान्यता दिली आणि पुढीलप्रमाणे ठरावास मंजूरी दिली :-

<u>ठराव क्र.११०२</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, वाहतुकीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कार्यकारी समिती याद्वारे जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता भाग-१ च्या दोन्ही बाजूला बांधकामासाठी सेवा मार्गाच्या रु.४१.५६ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे.

..२१/-

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** यासंबंधीची आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१७ : मजास जोगेश्वरी (पूर्व) या पुनर्वसन बसाहतीत मलनिःसारण योजनेची तरतूद करुन मूलभूत नागरी सुविधा पुरविणेबाबत.**

या प्रस्तावाची महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीस थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर, कार्यकारी समितीने प्रस्तावास मान्यता दिली आणि पुढीलप्रमाणे ठरावास मंजूरी दिली :-

**ठराव क्र.११०३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घ्यावयाचा मजास जोगेश्वरी (पूर्व) या पुनर्वसन व पुनर्वसाहतीत मलनिःसारण वाहिनी योजनेच्या रु.६.२५ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** यासंबंधीची आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठाणे जिल्ह्यामधील भिवंडी तालुक्यातील ५१ गावांच्या 'भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्र' यासाठी विकास योजना बनविण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करणे.**

या प्रस्तावाची महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीस थोडक्यात माहिती दिली.

त्यानंतर, कार्यकारी समितीने प्रस्तावास मान्यता दिली आणि पुढीलप्रमाणे ठरावास मंजूरी दिली :-

**ठराव क्र.११०४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे भिवंडी तालुक्यातील ५१ गावांच्या 'भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्र' यासाठी विकास योजना बनविण्यासाठी झेटजिस्ट ॲडव्हायसोरेट यांची रु.९७ लाख अधिक सेवाकर इतक्या फी वर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सल्लागारांच्या कामाचा आढावा घेणे व विकास योजना वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१९ : प्राधिकरणाच्या आस्थापनेवर एका सह महानगर आयुक्तांची व दोन उप-महानगर आयुक्तांची नियुक्ती करण्याची शासनास शिफारस करण्याबाबत.**

या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी थोडक्यात माहिती दिली.

१९.१ अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, प्रस्तावित केल्याप्रमाणे नियुक्त्या करण्यासाठी पदे निर्माण करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिलेली आहे का ?

त्या संदर्भात महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या अधिनियमातील कलम ११(१)(ब) मधील तरतुदींकडे लक्ष वेधले.

१९.२ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनीही असे नमूद केले की, पदांवरील नियुक्ती आणि पदाची निर्मिती या भिन्न बाबी आहेत. त्यामुळे प्रश्नाधीन पदे निर्माण करण्यास प्राधिकरणाची मान्यता मिळणे आवश्यक ठरते आणि जर तशी ती मिळालेली असेल तर पुन्हा त्यासाठी कार्यकारी समितीने शासनास शिफारस करणे सकृतदर्शनी तरी अप्रस्तुत ठरते.

१९.३ त्यानंतर, अधिनियमातील कलम ११(१)(ब) बाबत चर्चा झाली. श्री.मनु कुमार श्रीवास्तव, सचिव, नगर विकास विभाग यांनी असे निदर्शनास आणले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिनियमातही अशाच स्वरुपाची तरतूद आहे. त्यांनी असेही निदर्शनास आणले की, प्राधिकरणाच्या अधिनियमातील कलम ११(२) मध्ये जी पदे निर्माण करण्यास प्राधिकरणाची मंजूरी आवश्यक असल्याची तरतूद करण्यात आली आहे ती प्राधिकरणास दुय्यम

असलेली पदे असल्याचा स्पष्ट उल्लेख आढळतो. तसा उल्लेख कलम ११(१)(ब) मध्ये नाही. त्यामुळे कार्यकारी समितीच्या शिफारसीनुसार अशा नियुक्त्या शासनाद्वारे होऊ शकतात. त्यामध्ये ती पदे निर्माण करण्यासही शासनाद्वारे मंजूरी प्राप्त होणे अध्याहृत आहे.

१९.४ त्यानंतर, कार्यकारी समितीने प्रस्तावास मान्यता दर्शविली आणि खालीलप्रमाणे ठरावास मंजूरी दिली :-

<u>ठराव क्र.११०५</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ चे उपकलम (१ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवर भारतीय प्रशासन सेवेतील एका अधिका-याची सह महानगर आयुक्त म्हणून आणि रु.१४३००-४००-१८३०० या वेतनश्रेणीतील २ अधिका-यांची उप महानगर आयुक्त म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस राज्य शासनास करण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** राज्य शासनाद्वारे वरीलप्रमाणे नियुक्त होणा-या अधिका-यांच्या अधिकारकक्षा व त्यांची कर्तव्ये व जबाबदा-या निश्चित करण्याचे अधिकार याद्वारे महानगर आयुक्तांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.२०</u> : <u>मुंबई महानगर प्रदेशातील भाडेतत्वावरील (Rental) परवडणारी घरे (Affordable) मार्गदर्शक सुचना (Guidelines) निश्चित करणे.</u>**

२०.१ या प्रस्तावाबाबत सादरीकरणाद्वारे माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्तांनी असे स्पष्ट केले की, सर्वसामान्य नागरिकांना बृहन्मुंबईत घर घेणे परवडत नाही आणि अन्य कोणताही पर्यायच सध्या उपलब्ध नसल्याने झोपडपट्टीत राहण्याची वेळ येते. त्यामुळे प्राधिकरणाने भाडेतत्वावरील परवडणारी घरे बांधण्याचा पर्याय निर्माण करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे

नाईलाजास्तव झोपडपट्टयांमध्ये राहावे लागणा-यांना परवडणारा पर्याय उपलब्ध होऊन झोपडपट्टयांच्या वाढीस प्रतिबंध बसू शकेल. यासाठी भाडेतत्वावरील परवडतील अशी घरे बांधून मिळणेसाठी अतिरिक्त महानगर आयुक्तांनी ६ पर्यायी नमुन्यांचे विश्लेषणासह बैठकीत सादरीकरण केले. [पर्याय सोबत जोडले आहे (जोडपत्र-ब)]

२०.२ या विषयावरील चर्चेत सर्वच सदस्यांनी भाग घेतला. अशाप्रकारे घरे बांधणीच्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण महामंडळाची स्थापना झालेली असल्याने प्राधिकरणाने गृहनिर्माणाच्या क्षेत्रात प्रवेश करण्याबाबत सखोल विचारान्ती निर्णय घेतला जावा असे मत व्यक्त करण्यात आले. तसेच या इमारती भाडेतत्वावरील गाळयांच्या असल्याने त्यांच्या देखभाल दुरुस्तीचा प्रश्नदेखील उद्‌भवेल आणि प्राधिकरणाकडे त्यासाठी यंत्रणा नसल्याने या समस्येवरदेखील विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले गेले. तसेच झोपडपट्टीत राहणारे किती लोक या भाडेतत्वावरील घरांमध्ये स्थलांतरीत होणे पसंत करतील याबाबत तसेच झोपडपट्टयांच्या वाढीस या प्रकल्पामुळे आळा बसेल या दाव्याबद्दलही शंका उपस्थित करण्यात आली.

२०.३ श्री.मनु कुमार श्रीवास्तव यांनी अशी सूचना केली की, बांधण्यात येणा-या सदनिकांपैकी काही सदनिका वैद्यकीय उपचारार्थ मुंबईत येणा-या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी तर काही सदनिका मुलाखतींसाठी / परिक्षांसाठी मुंबईत येणा-या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात याव्यात. या सूचनेचे सर्वांनी स्वागत केले व ती स्वीकारावयास सहमती दर्शविली.

२०.४ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असे निदर्शनास आणले की, प्राधिकरणाने हाती घेतलेल्या प्रकल्पांमुळे बाधित होणा-यांच्या पुनर्वसनाकरिता प्राधिकरणाने खूप मोठया प्रमाणावर इमारतींची बांधकामे चांगल्या रीतीने बांधलेली आहेत. त्यामुळे घरे बांधण्यासाठी प्राधिकरणाकडे चांगला अनुभव आहे याबाबत दुमत नसावे. प्रश्नाधीन भाडेतत्वावरील घरांच्या योजनेसाठी रीतसर कार्यपध्दती अनुसरुन सुस्पष्ट धोरण मंजूर करुन घेऊन नंतरच पुढची कार्यवाही करण्यात येईल.

..२५/-

२०.५ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, प्राधिकरणाने इमारतींचे बांधकाम करण्याची कार्यवाही करण्यास सकृतदर्शनी हरकत दिसत नसली तरी त्या इमारतींच्या दुरुस्त्या / देखभालीसाठी प्राधिकरणाकडे जरुर ती यंत्रणा नाही हेही खरेच आहे. अशा स्थितीत इमारती बांधून झाल्यानंतर दुरुस्ती / देखभालीसह पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी त्या गृहनिर्माण मंडळाकडे सुपूर्द करण्यात याव्यात. या सूचनेशीदेखील सर्वांनी सहमती दर्शविली.

२०.६ त्यानंतर, कार्यकारी समितीने प्रस्तावास मान्यता दर्शविली आणि खालीलप्रमाणे ठरावास मंजूरी दिली :-

<u>ठराव क्र.११०६</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेशाच्या क्षेत्रामध्ये स्वस्त व भाडेतत्वावरील घरे निर्मितीची गरज असल्याने १६० चौ.फू. तळपृष्ठ क्षेत्राचे स्वतंत्र सोयी असलेली घरे बांधण्याची योजना असून मुंबई महानगर प्रदेशामधील रेल्वे व मोनोरेल व मास ट्रान्झीट कॉरिडॉर यांच्या जवळपास सुमारे ५,००,००० घरे ५ वर्षाच्या कालावधीमध्ये बांधण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी सुरुवातीचे भांडवल म्हणून रु.१०० कोटीची तरतूद सन २००८-०९ च्या प्राधिकरणाच्या अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली आहे. जमीन मिळविणे तसेच परवडतील अशी भाडेतत्वावरील घरे बांधण्याच्या दृष्टीने बाब टिप्पणीतील ६ पर्यायी नमुन्यांना तत्वतः मान्यता देण्यात येत आहे. या विविध पर्यायातील प्रत्येक प्रस्ताव छाननीसहीत कार्यकारी समितीच्या अंतिम मान्यतेसाठी महानगर आयुक्तांनी सादर करावा तसेच यासंबंधी चटईक्षेत्र निर्देशांक इत्यादी धोरणात्मक बाबींकरीता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही महानगर आयुक्तांनी करावी."

**<u>बाब क्र.२१</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (MUIP) अमर महल जंक्शन येथे सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता, पूर्व द्रुतगती महामार्ग व इतर जोडरस्त्यांची वाहतूक एकात्मिकृत करणेच्या कामासाठी आराखडा व संकल्पचित्र तयार करण्याकरिता सल्लागाराची नेमणूक करणे.</u>**

महानगर आयुक्तांनी असे नमूद केले की, या विषयाबाबत निर्णय घेण्यास महानगर आयुक्त सक्षम आहेत. त्यामुळे ही बाब कार्यकारी समितीपुढे आणण्याची वास्तविकतः गरज नव्हती. कार्यकारी समितीने याची नोंद घेतली व हा प्रस्ताव मागे घेण्यात आला.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

——— oooooooooooo ———

[जोडपत्र-अ (जोडपत्रे - १ व २) आणि जोडपत्र-ब]

# THE MUMBAI METROPOLITAN REGION SPECIFIED COMMODITIES MARKETS (REGULATION OF LOCATION) ACT 1983 - MAHARASHTRA ACT NO.XLII OF 1983.

WHEREAS the Mumbai Metropolitan Region Specified Commodities Markets(Regulation of Location) Act 1983 (Maharashtra Act No.XLII of 1983) has come into force in Brihan Mumbai with effect from 22nd November, 1983 and in the Mumbai Metropolitan Region with effect from 1st August, 1985 as appointed by the State Government by its Notification No.BMRDA-4485/1254/CR-172/85/UD-4, dated 1st August, 1985 published in the Maharashtra Government Gazette dated 1st August, 1985 ;

AND WHEREAS a Market Committee to be constituted under section 9 of the said Act is required to consist of six representatives elected by the licensees holding valid licenses for carrying on the specified trade in the Market yard;

AND WHEREAS the Executive Committee considers it expedient to so make Regulations;

NOW THEREFORE in exercise of its powers conferred by sub-sections (1) and (2) of section 10 of the said Act, the Executive Committee hereby makes the following Regulation:

1. Short Title: These Regulations may be called the Mumbai Metropolitan Region Iron and Steel Market Committee, Election Regulations, ~~1998~~ 2008.

2. <u>Commencement:</u> These Regulations shall come into force with effect from the day on which a notice shall be published in the Maharashtra Government Gazette of the State Government having sanctioned these Regulations.

3. Definition : In these Regulations, unless the context otherwise requires:

(a) "Act" means the Mumbai Metropolitan Region Specified Commodities Markets (Regulation of Location) Act, 1983

(b) "Authority" means Authority constituted under the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974 .

(c) "Metropolitan Commissioner" means a Metropolitan Commissioner appointed under section 11 of the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974.

(d) 'Specified Trade' means trade in the specified commodity of Iron & Steel.

(e) All other terms used here and not defined herein shall have meanings assigned to them in the Act.

4. <u>Qualification and Disqualification of Voter</u> : Every licensee holding a valid licence for carrying on the specified trade in the market yard shall be eligible to vote.

Provided that if a licensee is partnership firm as defined in the Partnership Act, 1932 or an association of persons or a company incorporated under the Companies Act 1956, a person nominated by such firm, association or company shall vote.

Provided further that if a licencee has been convicted of an offence under the Act, he shall be disqualified for voting at any election for a period of five years from the date of conviction.

5. Qualification and Disqualification of Candidate for Election: No person shall be a candidate for election unless he is qualified to be a voter.

6. Preparation and publication of list of voters:

(i) There shall be prepared a provisional list of voters by the Chief Executive Officer or an officer authorised by him with the previous written permission of the Metropolitan Commissioner. The provisional list shall mention the name and address of each voter qualified for voting on the last day of the month wherein the preparation of the list has been undertaken.

(ii) The Chief Executive Officer shall publish a notice in the Maharashtra Government Gazette and a newspaper circulating in the Market yard of such list having been so published on the notice board in his office and available for inspection to every voter. He shall forward a copy of such list to the Metropolitan Commissioner for publication in his office.

(iii) Objections may be filed by any licencee within seven days from the date of the publication of the notice in the Maharashtra Government Gazette and will be decided by the Chief Executive Officer. His decision shall be final and conclusive.

(iv) Upon the consideration of the objections so disposed of, the Chief Executive Officer shall draw up the final voters list and publish a notice of having done so in the Maharashtra Government Gazette and on the notice board in his office and in the office of the Metropolitan Commissioner.

7. Determination of time and place for different stages of the electoral process: Subject to the provisions of the Act and the Rules made thereunder, the Metropolitan Commissioner shall, for the purpose of constituting or reconstituting the Market

Committee or filling in a casual vacancy, notify by notice to be displayed in his office and the office of the Chief Executive Officer, the time and place for each stage of election within one week after the publication of the final voters list as aforesaid. The programme for the different stages shall be as follows:

| Sr. No. | STAGES | DATE |
|---|---|---|
| a) | Publication of provisional voters list | = X |
| b) | Objection to the provisional voters list | X + 7 days = Y |
| c) | Acceptance or rejection of objection | Y + 3 days = Z |
| d) | Publication of final voters list | Z + 4 days = A |
| e) | Appointment of Returning Officer/Presiding Officers and other staff for election | A + 3 days = B |
| f) | Acceptance of nomination | B + 1 day = C |
| g) | Objection to nomination | C + 1 day = D |
| h) | Scrutiny of nomination & acceptance/ rejection of nomination | D + 2 days = E |
| I) | Appeal against acceptance/rejection of nomination | E + 2 days = F |
| j) | Decision on appeal & assignment of symbols | F + 2 days = G |
| k) | Withdrawal of nomination | G + 2 days = H |
| l) | Assignment of symbols | H + 1 day = I |
| m) | Withdrawal of candidates | I + 2 days = J |
| n) | Voting (1 day) | J + 7 days = K |
| o) | Counting of votes & declaration of results | K + 2 days = L |
| p) | Constitution of Market Committee and election of office bearers. | L + 6 days = M |

8. <u>Appointment of Returning Officer, Presiding Officers and other staff for election</u>: The Metropolitan Commissioner shall appoint a Returning Officer for the purpose of election to be held under these Regulations. It shall be the general duty of the Returning Officer at any election to do all such acts and things as may be necessary for effectually conducting the election in the manner provided in these Regulations.

The Chief Executive Officer shall on demand of the Returning Officer provide to him such staff as may be determined by the Returning Officer to assist him in the conduct of election. The Returning Officer shall appoint the Polling Officer or Officers as he may consider necessary, but shall not appoint any person who has been employed by on behalf of or has been otherwise working for a candidate in or about the election. The Returning Officer, the Poling Officer and other persons so appointed shall work under the superintendence, direction and control of the Metropolitan Commissioner.

9. <u>Nomination of candidates, form of nomination paper, objection to the nomination, scrutiny of nomination and appeal against acceptance or rejection of nomination paper:</u>

(a) On or before the date appointed under Regulation 7 for making nomination, each candidate shall either in person or by his proposer deliver to the Returning Officer during the time and at the space specified in the order made under Regulation 7, a nomination paper in the prescribed form signed by the candidate and by two voters appearing in the final list of voters, one of whom shall be the proposer and the other seconder.

(b) The form of nomination paper will be in accordance with Annexure "I" hereto;

(c) Objection to the nomination may be taken by any voter in the final list of voters. The objection is to be filed with the Returning Officer(s); within the time prescribed in Regulation 7.

(d) Scrutiny of the nomination received within the period specified for filing of the nomination shall commence and the Returning Officer(s) will after taking into account validity of the objection take decision with regard to objection to nomination within the time prescribed in Regulation 7;

(e) Appeal against rejection or acceptance of nomination paper may be preferred before the Metropolitan Commissioner or the officer appointed by him in this behalf within the time prescribed in Regulation 7 .

(f) The decision on appeal against acceptance or rejection of nomination paper will be declared within the time prescribed in Regulation 7, and such decision shall be final and conclusive.

10. <u>Deposits to be made by the Candidates</u>: Every candidate contesting the election will be required to deposit a sum of Rs.100/-(one hundred only). This amount will not be refunded irrespective of acceptance or rejection of his nomination. The funds so generated will be transferred to the Market Committee and shall be used exclusively for incurring expenditure on the election.

11. <u>Assignment of Symbols of candidates</u>: The symbols to be assigned to the candidates may be out of the symbols allotted to independent candidates during the preceding election to the Legislative Assembly in the State. The Returning Officer will have the liberty to choose and restrict the list of symbols for assignment to the candidates, depending on the number of valid nominations received during the current election. Assignment of symbols will be made within the time prescribed in Regulation 7;

12. <u>Withdrawal of candidature</u>: After the assignment of symbols to candidates is over, any candidate may withdraw his candidature within the time prescribed in Regulation 7;

13. <u>Appointment of agents of candidates</u>: A candidate who has been assigned the symbol and has not withdrawn his candidature may appoint one person as his agent and such an agent may or may not be from the voters list. Appointment of such an agent shall be communicated in writing by him to the Presiding Officer at any stage after the withdrawal of candidature and before the date of voting. The agent so appointed by a candidate will normally be accepted by the Returning Officer unless he

thinks it otherwise for reasons to be recorded in writing and in that case the candidate will have an option of appointing another person as his agent acceptable to the Returning officer.

14. The form of ballot paper: The form of ballot paper shall be in accordance with Annexure II hereto.

15. Uncontested Elections: If, after the expiry of the period within which candidature may be withdrawn under Regulation 7, the member of candidates whose nominations have been accepted is equal to or less than the number of seats to be filled, the Returning Officer shall forthwith declare such candidate or all such candidates to be duly elected to fill the seat or the relevant number of seats and shall complete and certify the declaration.

16. Manner of recording Votes: The Seal of "X" will be kept in the safe custody of the Presiding Officer and the Symbol on which the seal is affixed only once shall be considered as the valid recording of the vote. The ballot paper containing seal mark in excess of the number of candidates to be returned through each ballot paper shall be regarded as the invalid vote.

17. Scrutiny of votes, counting or recounting of votes, declaration of results and procedure in case of equity of votes:

(i) At the end of scrutiny of each vote cast, the number of valid and invalid votes shall be recorded in duplicate and signed and one copy kept in each bundle. Each bundle shall not have more than 100 ballot papers;

(ii) Counting of votes shall take place within the specified time and according to the election time table in the presence of agents of candidates or the candidates, if they are available at the time of counting and are desirous of remaining present during the process of counting. In such a case, the candidate and/or his agent shall be invited to remain present, if they are available at that time;

(iii) Recounting of votes may be done on the demand made in this regard by the candidate or his agent only once;

(iv) In case of equality of votes, the result shall be declared by drawal of the winning lot;

(v) The declaration of results in the case of both contested and uncontested election shall be made under the signature of the Returning Officer as per the programme of election time table

18. Custody and disposal of papers relating to election: The custody of papers relating to elections shall be with the Chief Executive Officer or officer designated by him. In case of unused ballot papers, the same shall be preserved for one year after the closure of election process and may be destroyed thereafter. In case of used ballot papers, the same shall be preserved for a period of one year after the closure of election process i.e. the constitution of Market Committee except in the cases where if any litigation is pending in this regard, it shall be preserved till disposal of the pending litigation and in the case of disposed of litigation regarding election for a period of six months after the final order has been passed. The other papers relating to election viz. notification of the election programme, record relating to printing of ballot papers and its disposal, the final result of election, the final list of valid nominations, the final list of candidates and the list of office bearers of the Market Committee will be permanent records which may be destoryed only after thirty years. The record relating to appointment of Returning Officer, Presiding Officer and other staff for election shall be preserved for a period of at least two succeeding election or ten years, whichever is earlier.

19. Ancillary Provisions: It is hereby declared that the Maharashtra Specified Co-operative Societies Elections to Committees Rules 1971 as amended or substituted or re-enacted from time to time shall apply mutatis mutandis to election to be held under these Regulation subject to the condition that in the event of conflict between such Regulations and any of the foregoing Regulation made hereunder, the latter shall have the overriding effect.

*********

Encl: Annexure – I&II

३८
गोडपत्र -9

**ANNEXURE-I**

**Regulation No.9**

FORM OF NOMINATION PAPER

I hereby nominate ...................... as a candidate for election by licencees holding valid licences for carrying on the specified trade of iron and steel in the Market Yard

Name of the candidate. ...

Father's/Husband's name. ...

Age. ....

Full postal address of the candidate. ...

Serial number of the candidate in the final list of voters.

Name of the proposer. ..

Serial number of the proposer in the final list of voters.

Signature of the proposer.

Name of the seconder............................

Serial number of the seconder in the final list of voters.........................................

........................

Signature of the seconder

**Declaration by Candidate**

I hereby signify my willingness to serve as a member of the Mumbai Metropolitan Region Iron & Steel Market Committee, Kalamboli, if I am elected.

........................

Signature of the Candidate

Date: ............

nm-4(la_item.rtf)

36

जोडपत्र - 2

## ANNEXURE-II

### Regulation 14

### FORM OF BALLOT PAPER

Mumbai Metropolitan Region Iron & Steel Market Committee, Kalamboli.

_______________1999

| Name of candidate | Symbol assigned |
|---|---|
| 1 | 2 |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |
| ______________ | ______________ |

- Serial number of each ballot paper shall appear at the top on the front side.

---------